
अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ९ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे ▸ अंक : ३११ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८







# निधी रिलीज नाही झाला; अनुदानाचा विषय लटकला

## ■ सोलापूर जिल्ह्यातील ३५ हजार शेतकरी 'वाऱ्यावर'

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महात्मा जोतिबा फुले कर्जमुक्ती योजनेतील प्रोत्साहन अनुदानापासून सोलापूर जिल्ह्यातील ३५ हजार ७१५ शेतकरी अद्यापही वंचित आहेत. राज्य शासनाने याबाबतची घोषणा करून वर्ष उलटले तरीही शेतकऱ्यांच्या पदरात अनुदानाची रक्कम पडलेली नाही.ज्यांना अनुदान मिळाले नाही,असे शेतकरी वारंवार बँकांकडे हेलपाटे मारत आहेत. प्रामाणिकपणे कर्ज भरूनही जाहीर केलेले अनुदान मिळत नसल्याने गरीब शेतकरी विवंचनेत आहे. याबाबत विधानसभेच्या 'हाऊस'मधील चर्चेतून एक धक्कादायक माहिती उजेडात आली. या अनुदानासाठी राज्याकरिता मंजूर असलेला ७४० कोटींचा निधी अर्थखात्याने रिलीज न केल्याने अनुदानाचा विषय लटकला आहे.**





मागील काही वर्षात विविध भागात दुष्काळ सदृश परिस्थितीमुळे आणि अवेळी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे तसेच या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर शेतीच्या संबंधित असलेल्या बँकांच्या कर्जाची परतफेड होऊ शकली नाही, त्यामुळे राज्यातील शेतकरी कर्जबाजारी झाला तसेच यामुळे त्यांना नव्याने शेती संबंधित गरजा पूर्ण करण्यासाठी पीक कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या. या पार्श्वभूमीवर हिवाळी अधिवेशन २०१९ मध्ये राज्य सरकारने महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेची घोषणा केली. मात्र,वेळेवर म्हणजे बँकांनी दिलेल्या मुदतीत कर्ज फेडलेल्या शेतकऱ्यांना काय? असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर नियमित कर्जफेड केलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन म्हणून अनुदान देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार अशा शेतकऱ्यांची यादी बँकांकडून डीडीआर खात्याला पाठवली गेली.त्यानंतर ही यादी राज्य शासनाकडे पाठवण्यात आली. काही शेतकऱ्यांना अनुदानाच्या रकमा मिळाल्या पण नंतरचे शेतकरी प्रतीक्षा करत राहिले. गेल्या दिवाळीपर्यंत अनुदान देण्याची प्रक्रिया फास्ट चालली होती मात्र पुढे ती ढेपाळली,असे सांगण्यात येते. शासनाकडून अनुदानाची रक्कमच न मिळाल्याने शेतकऱ्यांना दुसऱ्या, तिसऱ्या यादीत आपले नाव येईल, असे सांगितले गेले. तरीही नाव न आल्याने शेतकरी संभ्रमावस्थेत आहेत.

### ७४० कोटींना मान्यता केव्हा देणार?

राज्यात या अनुदानापासून वंचित असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ७४० कोटींची गरज आहेत. या रकमेच्या वितरणाला राज्य सरकारने अद्याप मान्यता न दिल्याने अनुदानाचा विषय प्रलंबित राहिल्याचे सांगण्यात येते. शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी संघटना व लोकप्रतिनिधी गप्प कसे बसले आहेत? असा शेतकऱ्यांचा सवाल आहे.

### तांबेंनी फोडली वाचा...



विधी मंडळाचे अधिवेशन नुकतेच संपले. त्यात अनुदानाचा प्रश्न छेडण्यात आला. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी १५ ऑगस्टपर्यंत हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, अशी ग्वाही दिली. मात्र आमदार सत्यजित तांबे यांनी हा प्रश्न अत्यंत पोटतिडकीने उपस्थित करून राज्य सरकारला धारेवर धरले. वर्षभरानंतरही अनुदान मिळत नाही. त्याबद्दल चौकशी का केली नाही? असा संतप्त सवाल तांबेंनी विचारताच सरकार खडबडून जागे झाले. त्यावेळी सत्य माहिती सरकारला सांगावी लागली.

### २ लाख शेतकरी वंचित

राज्यातील दोन लाख शेतकरी अद्यापही या अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत. सन २०१७-२०१८,२०१८-१९ व २०१९-२० या तीन आर्थिक वर्षांपैकी दोन आर्थिक वर्षांमध्ये पीक कर्जाची शासन निर्णयानुसार विहित कालावधीत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना हे अनुदान मिळणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील ७१ हजार २१८ कर्जखात्यांपैकी ३५ हजार ५०३ शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले. अद्यापही ३५ हजार ७१५ शेतकरी वंचित आहेत,अशी माहिती तांबे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सरकारकडून देण्यात आली.




**जामर लगाया जोरसे.... :** सोलापुरातील बेशीस्त वाहतुकीला आळा घालण्यासाठी शहर वाहतूक शाखेने नवी शक्कल वाढवली आहे. शिवाजी चौकात मंगळवारी विरुद्ध दिशेने येणाऱ्या दोन दुचाकीस्वारांच्या गाड्या पकडून दोन्ही गाड्यांच्या पुढच्या चाकाला जामर लावून रोख लावला.

# भगीरथ भालके विकासासाठी नाही स्वत:चा गट टिकवण्यासाठी बीआरएसमध्ये गेले : आ.आवताडे

✔ सुराज्य/सोलापूर



भगीरथ भालके हे तालुक्यातील जनतेचा विकास व्हावा म्हणून बीआरएस येस पक्षात गेले नाहीत तर ते स्वत: च गट टिकवण्यासाठी गेले आहेत. अशी बोचरी टीका समाधान आवताडे यांनी पत्रकारांशी बोलताना केली.

ते मंगळवारी सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटण्यासाठी आले होते. त्या वेळी त्यांनी मनीषा आव्हाळे यांच्याकडे तालुक्यातील विकास कामाच्या संदर्भात समस्या मांडल्या. पाण्याच्या संदर्भात सध्या तालुक्यामध्ये चाळीसगावा पैकी २७ गावांमध्ये पाणीपुरवठा होत असून उर्वरित१३ गावे पाण्यापासून वंचित आहेत त्या १३ गावे मध्ये तातडीने पाण्याची उपलब्ध करून मार्गी लावावे. तालुक्यातील अनेक शाळेत शिक्षकांची कमी आहे. तिथे तातडीने शिक्षकांची नेमणूक करावी. सध्या तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. त्यातील अनेक कामे अपुरी दिसत आहेत. ते तातडीने पूर्ण करावीत अशा प्रकारच्या विकास कामाच्या समस्या त्याने आव्हाळे यांच्याकडे मांडल्या.


आव्हाळे यांनी ज्या ज्या ठिकाणी लवकरात लवकर कामे करता येतील ते आम्ही तातडीने मार्गी लावू पाण्यासारखा महत्त्वाचा विषय आहे तोही लवकरच मार्गी लावू अशा प्रकारचे सकारात्मक आश्वासन आ. आवताडे यांना दिले.

# पीक विमा योजनेतील कोट्यवधींचे खटले प्रलंबित

✔ सुराज्य/नवी दिल्ली

पंतप्रधान पीक विमा योजनेतील लाभार्थ्यांचे २०२१-२२ मधील २,७६१.१० कोटी रुपयांचे दावे प्रलंबित असल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी संसदेत दिली.

राजस्थान, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्याला मिळणारे पीक विम्याचे पैसे सर्वाधिक प्रलंबित आहेत. या तीन राज्यातील शेतकऱ्यांना अद्याप अडीच हजार कोटी रुपयांची भरपाई मिळालेली नाही, त्यात



महाराष्ट्रातील ३३६ कोटी रुपयांचे दावे प्रलंबित आहेत. महाराष्ट्रासह गुजरात आणि राजस्थानमधील काही शेतकऱ्यांचे (पंतप्रधान पीकविमा योजनेचे) पीक विम्याचे पैसे अद्याप मिळाले नाहीत, त्याविषयी विचारलेल्या प्रश्नांला नरेंद्रसिंह तोमर यांनी उत्तर दिले आहे. महाराष्ट्राची भरपाई ३३६ कोटी रुपये आहे. सर्वाधिक थकित भरपाई रक्कम राजस्थानची तेराशे कोटी इतकी आहे.

पंतप्रधान पीक विमा योजना अंतर्गत दावे सामान्यत: संबंधित विमा कंपन्यांद्वारे काढणीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत आणि पेरणी रोखण्यासाठी, मध्य हंगामातील प्रतिकूलता आणि कापणीनंतरच्या नुकसानीच्या जोखमींसाठी अधिसूचनेच्या एक महिन्याच्या आत अदा केले जातात. त्याशिवाय प्रिमियम सबसिडीचा एकूण हिस्सा वेळेत मिळतो. काही राज्यांमध्ये दाव्यांचा निपटारा होण्यास उशीर झाला, कारण उत्पन्नाची माहिती विलंबित प्रसारित झाली, असे तोमर यांनी सांगितले. तोमर यांनी लेखी उत्तरात दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान पीक विमा योजनेतील लाभार्थ्यांचे २०२१-२२ मधील जुलै जून महिन्यातील २७०० कोटीचे दावे प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकराणात राज्यस्थान आघाडीवर आहे.

# दहा लाखांची लाच स्वीकारताना 'डीन'ला रंगेहाथ पकडले

✔ पुणे : येथील महानगरपालिकेत नव्याने स्थापन झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी सोळा लाख रुपये लाचेची मागणी केली होती. त्यामधील दहा लाख रुपये स्वीकारताना डीनला रंगेहात पकडण्यात आले.

मंगळवारी सायंकाळी पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयात ही कारवाई करण्यात आली आहे. आशिष श्रीनाथ बनगिनवार, (वय ५४ वर्ष, डीन (वर्ग-१) असे रंगेहात पकडण्यात आलेल्या आरोपींचे नाव आहे. पुणे, शिक्षणाच्या महेर घरात पुणे महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या डीनला तबल १० लाख रुपयांची लाच घेताना पुणे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. त्यांनी १६ लाखांची मागणी केली होती. त्यातील पहिला हप्ता घेताना पकडण्यात आले. या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



भविष्यात ओझे उचलण्याचे काम तरी नक्की मिळेल !!!

| कल्याण |
|---|
| 789-48-170 |

| मेन बाजार |
|---|
| 126-92-147 |

# राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ

## एकाचा मृत्यू; नव्या व्हेरिएंटची चिंता

- जून आणि जुलैमध्ये या व्हेरिएंटच्या रुग्णांची संख्या लक्षणीय नव्हती
- ऑगस्ट महिन्यात करोना रुग्णांची संख्या वाढली आहे

✔ सुराज्य/पुणे

गेल्या काही दिवसांपासून जवळपास नामशेष झालेल्या करोना संसर्गाने राज्यात पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. राज्यातील करोना रुग्णांच्या संख्येत पुन्हा एकदा किंचित वाढ नोंदवली गेली आहे. तसेच करोनाचा ओमायक्रॉन EG.५.१ हा नवा व्हेरिएंटही आढळून आला आहे. देशात पहिल्यांदाच या व्हेरिएंटचा रुग्ण सापडला आहे.

बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ संशोधक आणि महाराष्ट्राच्या जिनोम सिक्वेन्सिंगचे संयोजक डॉ. राजेश कार्यकर्ते यांनी दिलेल्या माहितीनुसार, मे महिन्यात ओमायक्रॉन EG.५.१ व्हेरिएंट सापडला होता. मात्र, त्यानंतर जून आणि जुलैमध्ये या व्हेरिएंटच्या रुग्णांची संख्या लक्षणीय नव्हती. गेल्या दोन महिन्यात राज्यात केवळ XBB.१.१६ आणि XBB.२.३ व्हेरिएंटचे रुग्ण सापडले आहेत. राज्य आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, ऑगस्ट महिन्यात करोना रुग्णांची संख्या वाढली आहे. जुलैच्या शेवटापर्यंत राज्यातील सक्रिय करोना रुग्णांची संख्या ७० इतकी होती. पण ६ ऑगस्टला नोंदवण्यात आलेल्या करोना रुग्णांची संख्या ११५ इतकी होती. तर सोमवारी नोंदवण्यात आलेल्या सक्रिय करोना रुग्णांची संख्या १०९ इतकी आहे. रुग्णांची संख्या वाढण्यासाठी ओमायक्रॉन EG.५.१ व्हेरिएंट कारणीभूत ठरत असल्याचे समजते. यापूर्वी EG.५.१ व्हेरिएंटमुळे इंग्लंडमध्ये चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. या व्हेरिएंटमुळे इंग्लंडमधील करोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढली होती. ओमायक्रॉनच्या EG.५.१ या व्हेरिएंटचे अद्याप देशभरात फारसे रुग्ण सापडलेले नाहीत. मात्र, रुग्णालयात दाखल होणाऱ्या नव्या करोना रुग्णांवर लक्ष ठेवले जात आहे. सध्याच्या घडीला मुंबईत करोनाचे सर्वाधिक ४३ सक्रिय रुग्ण आहेत. त्यापाठोपाठ पुण्यात ३४ आणि ठाण्यात करोनाचे २५ सक्रिय रुग्ण आहेत. तर रायगड, सांगली, सोलापूर, सातारा आणि पालघरमध्ये करोनाचा प्रत्येकी एक सक्रिय रुग्ण आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, सध्याची परिस्थिती पाहता करोना रुग्णांच्या संख्येत फार मोठी वाढ झाली आहे, असे म्हणता येणार नाही. आम्ही सध्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. प्रत्येक आठवड्याला परिस्थितीला आढावा घेतला जात आहे. जून ते सप्टेंबर या काळात श्वसनाचे विकार असणाऱ्या रुग्णांची संख्या वाढते. त्यामुळे रुग्णांची संख्या करोनामुळेच वाढली आहे का, हे तपासले जाईल.

# गतवर्षीच्या तुलनेत यंदा उजनी ७४ टक्क्यांनी पिछाडीवर

## ११% टप्पा पार

✔ सुराज्य/टेंभुर्णी

उजनी धरण पाणलोट क्षेत्रात पावसाने हजेरी लावल्याने उजनी धरणावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. चालू पावसाळी हंगामाच्या सुरुवातीच्या६९ दिवसांत उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्राच्या धरणसाखळी क्षेत्रात १४९३२ मि.मी तर उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात २१८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

मात्र उजनीत समाधानकारक वाढ झालेली नसल्याने शेतकऱ्यांत निर्माण झालेला आनंद वातावरण हळूहळू चिंतेत बदलू लागले आहे. उजनी धरणात गेल्यावर्षीपेक्षा यावर्षी ७४ टक्के पाणी कमी आहे तर टीएमसी मध्ये गतवर्षी गतवर्षी १०८.८५ टीएमसी पाणी होते तर यावर्षी ६९ टीएमसी पाणी आहे म्हणजेच गतवर्षीपेक्षा यावर्षी उजनी धरणात तुलनात्मक ३९ टीएमसी पाणी



कमी आहे. सद्यस्थितीला उजनी धरणाची टक्केवारी तब्बल उणे ३६.१९टक्क्यांपर्यंत गेली होती., सध्या उजनी धरणाची पाणीपातळी ४९१.८१० मी. एकूण पाणीसाठा १९३२.६३.दलघमी तर उपयुक्त पाणीसाठा १५९.८२दलघमी तर टक्केवारी १०.५३ एवढी नोंदविण्यात आला आहे. उजनीच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या ६९ दिवसात २१८मिमी पावसाची नोंद झाली असून, यामुळे उजनी धरणात यंदा पाणीसाठा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पावसामुळे हवेतील उष्णता कमी होऊन आद्रता वाढल्यामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण ७.५० मिमीवरून ते ०.८१मिमीवर खाली आले आहे. उजनी धरणाच्या वरील बाजूस असणाऱ्या १८ धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जरी पाऊस चालू असला तरी त्याचा फायदा अद्यापपर्यंत उजनी धरणाला झालेला नाही.दौंड येथून खूप थोडा विसर्ग उजनीत येतो आहे, तो मंगळवारी ७,१०३ क्युसेकने चालू आहे.या पावसाळ्यातील नैसर्गिक प्रवाह चालू झाला आहे.तर बंडगार्डन येथून येणारा विसर्ग कमी कमी होत आहे. तो सध्या ३,८१९ क्युसेकने येत आहे.

या उजनीच्या वरील बाजूस असणाऱ्या धरणांपैकी जवळपास १४ धरणे +९०% च्या पुढे आहेत. त्यामुळे पावसाचा सांगितलेला अंदाज आणि या धरणाची स्थिती याचा विचार केला असता पुढील काळात मोठ्या प्रमाणात परस्थिती लवकरच होण्याची शक्यता निर्माण होवू शकते,मात्र सध्यातरी उजनी धरण मोठ्या पावसाच्या व विसर्गाच्या प्रतिक्षेत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.